महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
पहिला मजला, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

☏- ०२२ २२०४ ७१४५ Email-sodesk१४.tdd@gov.in

क्रमांक :- वहका-२०२३/प्र.क्र.२२०/का.१४ दिनांक- ०१ डिसेंबर, २०२३

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी.
(सोलापूर,बीड, जालना, उस्मानाबाद,लातूर,परभणी
रत्नागिरी, मुंबई शहर वगळून)

**विषय:-अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता ) अधिनियम २००६, नियम २००८ व सुधारित नियम, २०१२ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या उपविभागस्तरीय वनहक्क समिती व जिल्हास्तरीय वनहक्क समिती यांच्या गणपूर्तीबाबत.**

**संदर्भ:-** महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेची दि.११.१०.२०२३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**महोदय/महोदया,**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता ) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम, २०१२ या अंतर्गत जिल्हास्तरीय वनहक्क समिती व उपविभागस्तरीय वनहक्क समिती यांच्या गणपूर्तीबाबत काहीही नमूद केलेले नाही. राज्यामध्ये बऱ्याच ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या ( जिल्हा परिषद, पंचायत समिती ) यांच्या निवडणूका झालेल्या नसल्याने जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर सदस्यांच्या नेमणुका झालेल्या नाहीत. जिल्हास्तरीय वनहक्क समिती व उपविभागस्तरीय वनहक्क समिती यामध्ये अशासकीय सदस्य म्हणून अनुक्रमे जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांचा समावेश आहे. त्यामुळे या सदस्यांच्या अभावामुळे सदर समितींच्या गणपूर्ती अभावी बैठका घेणे शक्य आहे किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी कार्यलयांकडून विचारणा करण्यात येत होती. त्यामुळे सदर मुद्दा हा महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार समितीच्या दि.११.१०.२०२३ रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आला होता. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे.

उक्त बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार आपणास कळविण्यात येते की, अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६, नियम,२००८ व सुधारणा

नियम, २०१२ अंतर्गत उपविभागस्तरीय वनहक्क समिती व जिल्हास्तरीय वनहक्क समिती च्या बैठका आयोजित करतांना उपलब्ध व उपस्थित सदस्यांच्या साध्या बहुमताने वनहक्क दाव्यांसंदर्भात कार्यवाही करण्यात यावी.

**आपला,**

SATISH VITHALRAO KOVE

Digitally signed by SATISH VITHALRAO KOVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=e13b027a7b550970150cf7dc69d276db3b1a6ebe3f71610fb5e8ff55b1676c8a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CE18732734BA0742D7712775E8F0AD400558E8748375399762FD447C3E9AC1EB, cn=SATISH VITHALRAO KOVE
Date: 2023.12.01 14:36:02 +05'30'

**सहपत्र-वरीलप्रमाणे**

**( सतिश कोवे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

(१) मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
(२) सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
(३) आयुक्त आदिवासी ,संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
(४) उप सचिव/अवर सचिव (का-१४), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
(५) निवडनस्ती (का-१४), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.